महाराष्ट्र शासन
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय,जळगाव
श्री गुलाबराव देवकरअभियांत्रिकी महाविद्यालय परीसर,
शिरसोल रोड जळगांव-४२५००१
ईमेल – ghmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शाहोमज/भांडार विभाग/लेखनसामुग्री खरेदी २०२५-२६/ २१६३ दि.२५/ ९/२०२५

# सुधारीत दरपत्रक जाहीर सुचना

विषय:- शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय जळगांवकरिता लागणारी लेखनसामुग्री व किरकोळ साहित्य इत्यादी करीता दरपत्रक सादर करणेबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाची दरपत्रक सुचना/जा.क्र./भांडार विभाग/लेखनसामुग्री खरेदी/२११५/ दि.१५.०९.२०२५.

उपरोक्त विषयाबाबत सर्व पुरवठादारांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भान्वये या कार्यालयाने १५.०९.२०२५ व २०.०९.२०२५ दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु २०.०९.२०२५ रोजी पर्यंत या महाविद्यालयास दरपत्रक उपलब्ध न झाल्याने सुधारीत दरपत्रक सुचना जाहिर करण्यात येत.

त्यानुषंगाने ,वित्त विभाग शासन निर्णय दि. १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका उपविभाग दोन अ.क्र. १ नियम क्रमांक २ व ७ नुसार महाविद्यालय व रुग्णालयकरीता एक वर्षाच्या कालावधीकरीता यासोबत जोडलेल्या यादीतील नमुद Specification नुसार इच्छुक व पात्र पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी त्यांची कमीत कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावीत.

**दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी पासुन पर्यंत | २३.०९.२०२५ ते २९.०९.२०२५(शासकीय व स्थानिक सुट्टीचे दिवस वगळुन) |
| २ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | ३०.०९.२०२५ दुपारी ३.३० वाजता |
| ३ | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय जळगांव. |

**अटी व शर्ती**

१. दिनांक २९.०९.२०२५ रोजी सांय.५ वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

२.दरपत्रकाच्या पाकीटावर " **लेखनसामुग्री व किरकोळ साहित्य दरपत्रके**" असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. आवश्यक त्या ठिकाणी दरपत्रकावर दिनांक व ठिकाण स्पष्टपणे नमुद करावेत.

४. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील, तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सूचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्थ असू नये, तसेच राजकीय पक्षाशी सबंध असता कामा नये तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. (हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/ Income Tax कपात करण्यात येईल. सदर टॅक्स मधुन सुट अनुज्ञेय असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

८. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

९. पुरवठा करण्यात येणारी वस्तु संस्थेस पोहोच करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्यासाठी कोणतेही अतिरक्त शुल्क अदा केले जाणार नाही.

१०. शा.निर्णय उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता / गैरप्रकार/नैतिक अधःपतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास पुरवठादारा विरुध्द भारतीय दंडसहिता मधील उचीत कलमानुसार कारवाई करण्यात येईल.

११. यशस्वी दरपत्रक धारकासपुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत सदर वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच वस्तुंचा पुरवठा केल्यानंतर सदर वस्तु कालबाह्य / खराब असल्याचे निदर्शनास असल्यास सदर वस्तु स्वखर्चाने परत नेऊन त्याऐवजी नवीन वस्तूंचा पुरवठा ०७ दिवसाचे आत करणे बंधनकारक राहील.

१२. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१३. अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्द करणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत.

१४. यशस्वी दरपत्रक धारकास वस्तुंचा पुरवठा स्वःखर्चाने महाविद्यालय पर्यंत करावा लागेल तसेच वस्तु मध्ये तुटफुट किंवा गहाळ झाल्यास वस्तुंचा स्विकार केल्या जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

१५. दरपत्रकासोबत सादर केलेल्या वस्तुंचे स्पेसिफिकेशन मान्य असल्याबाबत खरेदी करावयाच्या वस्तुंचा तपशिल यावर Specification Accepted असे नमुद करुन स्वाक्षरी करावी. Specification मान्य केल्यानंतर Specification नुसार वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक राहील. Specification नुसार नसलेल्या वस्तुंचा स्विकार केला जाणार नाही.

१६. दरपत्रक उघडण्याचे वेळी दरपत्रक सादर केलेल्या पुरवठादार किंवा त्यांच्या एक प्रतिनिधी (पुरवठादाराचे लेखी मान्यतेचे पत्र घेऊन) ओळखपत्रासह उपस्थित राहता येईल.

Scanned with OKEN Scanner

१८ महाविद्यालय असलेला करार संपल्यानंतरही पुढील दर करार होईपर्यंत ज्या पुरवठादाराचे दर मान्य झालेले आहे त्यांनी दरकरार मध्ये मान्य झालेल्या दरानेच वस्तुचा पुरवठा करावा लागेल.

१९. ज्या पुरवठादाराचे दर मान्य झालेले आहे त्यांनी साहित्याचा पुरवठा करुन देयक तीन प्रतीत महाविद्यालयातील कार्यालयास सादर करावे. कार्यालयास शासनाकडुन प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध झाल्यानंतर देयकाची रक्कम अदा करण्यात येईल यांची नोंद घ्यावी देयक देण्यास विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही. याची पात्र पुरवठादारकांनी नोंद घ्यावी.

२०. ज्या पुरवठादारास काम मंजुर करण्यात येईल त्यांना कामाचा आदेश देण्यापुर्वी त्यांच्याकडून रक्कम १०० रुपयाचा स्टॅम्प पेपरवर अटी व शर्तीसह बंधपत्र लिहून घेण्यात येईल.

२१. खालील कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही मूदत अथवा सवलत पुरवठादारास दिली जाणार नाही.

लिफाफा क्रंमाक ०१ - (तांत्रिक लिफाफा) मध्ये अर्जासह खालील कागदपत्र सादर करावी. (लिफाफावर " तांत्रिक लिफाफा" असे नमुद करावे)

लिफाफा क्रंमाक ०२ -(दरपत्रक लिफाफा) मध्ये दरपत्रक लिफाफा सादर करणे आवश्यक आहे. (लिफाफावर "दरपत्रक लिफाफा" असे नमुद करावे )

तांत्रिक लिफाफा सोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल.

१. Annexure B

२. GST नोंदणी प्रमाणपत्र (साक्षांकीत)

३. पॅनकार्ड व आधार कार्ड (साक्षांकीत)

४. मुबंई दुकान व संस्था अधिनियम, १९४७ अंतर्गत शॉपॲक्ट परवाना नुतनी करणासहीत

५. हमीपत्र-१ व हमीपत्र-२

६. काळ्या यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत निविदाकाराने करावयाच्या घोषणेचा नमुना अधिष्ठाता शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव.

MSChandie

(वैद्य सुभाषचंद्र मडावी)
अधिष्ठाता,
शासकीय होमिपॅथी होमिओपॅथी
जळगांव

प्रति,

१. सुचना फलक, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव

२. शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव (www.ghmcjalgaon. Com)या वेबसाईटवर प्रसिध्द करणे

Scanned with OKEN Scanner

सिलबंद अ प्रपत्र पाकीटात सादर करण्याचे दरपत्रक

शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय,जळगांव येथील कार्यालयीन लेखन सामुग्री खरेदी दरपत्रक

| अ.क्र. | वस्तुंचे नाव | प्रमाण/नग/संख्या | प्रति नग किमत (रुपये) | जी.एस.टी | एकुण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ए ४ साईज रीम | | | | |
| २ | बॉक्स फाईल मोठी | | | | |
| ३ | बॉक्स फाईल छोटी | | | | |
| ४ | कात्री | | | | |
| ५ | पंचीन मशीन छोटी | | | | |
| ६ | पंचीन मशीन मोठी | | | | |
| ७ | कटर मोठे | | | | |
| ८ | टोच्या | | | | |
| ९ | स्केल पट्टी मोठी | | | | |
| १० | पेन्सील बॉक्स | | | | |
| ११ | शॉपनर बॉक्स | | | | |
| १२ | स्टॅपलर लहान साईज | | | | |
| १३ | स्टॅपलर मोठे साईज | | | | |
| १४ | डिंक बॉटल १५० मिली | | | | |
| १५ | इंक बॉटल | | | | |
| १६ | इंक पॅड मोठे | | | | |
| १७ | साधी ऑफीस फाईल | | | | |
| १८ | परमानंट मार्कर पेन लाल | | | | |
| १९ | परमानंट मार्कर पेन निळे | | | | |
| २० | परमानंट मार्कर पेन काळे | | | | |
| २१ | हायलायटर | | | | |
| २२ | कॅलक्युलेटर लहान | | | | |
| २३ | स्टॅपलर पीन छोटे | | | | |
| २४ | स्टॅपलर पीन मोठे | | | | |
| २५ | व्हाईटनर | | | | |
| २६ | टिस्को टेप व्हाईट १ इंच | | | | |
| २७ | टिस्को टेप व्हाईट २ इंच | | | | |
| २८ | टिस्को टेप ब्राऊन २ इंच | | | | |
| २९ | फेविकॉल बॉटल ५०ग्रॅम | | | | |
| ३० | नोटीस बोर्ड २ बाय ३ | | | | |
| ३१ | कुलुप मोठे | | | | |
| ३२ | एक्सटेंशन बोर्ड | | | | |
| ३३ | निळे पेन बॉक्स | | | | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | काळे पेन बॉक्स | | | | |
| ३५ | लाल पेन बॉक्स | | | | |
| ३६ | पेन्सील बॉक्स | | | | |
| ३७ | शॉपनर बॉक्स | | | | |
| ३८ | खोडरबर बॉक्स | | | | |
| ३९ | टपाल पॉकीट लहान(ब्राउन) | | | | |
| ४० | टपाल पॉकीट मोठे | | | | |
| ४१ | रजिस्टर २ क्वायर | | | | |
| ४२ | रजिस्टर ४ क्वायर | | | | |
| ४३ | प्लॉस्टीक फोल्डर (बटन) | | | | |
| ४४ | निळे कार्बन पेपर | | | | |
| ४५ | स्पंज डबी | | | | |
| ४६ | टपाल पॅड | | | | |
| ४७ | पेपर फॅल्ग | | | | |
| ४८ | रेड टॅग बॉक्स | | | | |
| ४९ | व्हाईट टॅग बॉक्स | | | | |
| ५० | टाचणी बॉक्स | | | | |

दरपत्रक पुरवठादाराचा शिक्का व स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner

Annexure-B

---

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमुद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे

प्रति,
अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय जळगांव.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली किंवा कसे |
|---|---|---|
| १. | पुरवठादाराचे नाव | |
| २. | कंपनीचा पत्ता,दुरध्वनी ई-मेल आयडीसहित | |
| ३. | कंपनीचा नोंदणी क्रमांक (Registration No.) | |
| ४. | GST No. | |
| ५. | PAN No. | |
| ६. | इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास अशा प्रकारचे संकेतस्थळ कार्यन्वीत करुन दिले असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र.अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ७. | हमिपत्र | |

स्थळ :

दिनांक : पुरवठादाचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

Scanned with OKEN Scanner

## हमिपत्र-१ ( Undertaking)

-------------------------------

प्रति ,

अधिष्ठाता

शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय,

जळगांव.

मी------------------------------------लेखी हमी देत आहे की,आपल्या कार्यालयामार्फत साहित्य खरेदी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असुन माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी /खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नाहीत असे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :

दिनांक : पुरवठादाचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

Scanned with OKEN Scanner

हमिपत्र-२( Undertaking)

-----------------------------------------

प्रति ,
अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव.

मी-----------------------------------लेखी हमी देत आहे की,आपल्या कार्यालयामार्फत साहित्य खरेदी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थासोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष संबंध वा सहभाग नाही तसे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :

दिनांक : पुरवठादाचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

Scanned with OKEN Scanner

## काळ्या यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबतचे घोषणापत्र

प्रति,
मा.अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय जळगांव.

मी------------------------------------ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत साहित्य खरेदी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असुन माझ्या संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही. अथवा माझ्या संस्थेवर कोणत्याही प्रकारची बंदी टाकण्यात आलेली नाही.तसे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :

दिनांक : पुरवठादाचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

Scanned with OKEN Scanner